


**प्रेक्षणीय स्थळे व प्रकल्प :** बेलदरे गावच्या सभोवताली अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. यामध्ये देवळे, धरण, धबधबा, पवन ऊर्जा प्रकल्प, सौर ऊर्जा प्रकल्प, ट्रेकींग पॉईन्ट, किल्ले व शेतीवर आधारित लहान व मोठे उद्योग यांचा समावेश आहे. म्हणुनच आम्ही आपल्याला आपलं गाव तसेच बेलदरे गाव सभोवतालच्या उत्तम पर्यटनाचा अनुभव मिळवून देण्याची हमी देतो.

श्री समर्थ रामदास स्वामी प्रस्थापित ११ मारुती दर्शन, पालीचा खंडोबा, ओझर्डे धबधबा, वसंतगड, सरसेनापती हंबीरराव बाजी मोहिते यांची समाधी, कृष्णा व कोयना नदीचा संगम घाट तसेच प्रितिसंगम उद्यानातील संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण ह्यांच्या समाधीला भेट देता येईल. दुग्ध प्रक्रिया केंद्र, साखर कारखाना, गुऱ्हाळ तसेच बचतगटाच्या लघुउद्योग प्रकल्पास भेट देऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेबद्दलही आपणास अधिक माहिती मिळू शकेल. यामुळे बेलदरे गावच्या सभोवताली असणाऱ्या पर्यटन स्थळांना पर्यटक मोठ्या प्रमाणात भेट देतील जेणेकरुन ग्रामिण अर्थव्यवस्थेत बदल होईल.

## एकदिवसीय सहल

प्रौढांसाठी : रु. ३५०/- (फक्त शनिवार व रविवार रु. ३७५/-)
मुलांसाठी : रु. २५०/- (वय वर्षे ३ ते १२)
सकाळचे सत्र : सकाळी १० ते दुपारी ३ वा.
दुपारचे सत्र : दुपारी १ ते संध्याकाळी ६ वा.
संध्याकाळचे सत्र : संध्याकाळी ५ ते रात्री १० वा.
(कमीतकमी २५ लोक आवश्यक)

**यात समाविष्ट :** नाश्ता , चहा / कॉफी, जेवण गोड पदार्थासहित,रेनडान्स, स्विमिंग पूल, डीजे. बैलगाडी सफारी, बैठे व मैदानी खेळ, कृषी पर्यटनावर आधारित सहल

**जैन जेवण मिळेल**

शाळा कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय सहल सत्र सकाळी १० ते सायं. ५ वा.

## एका रात्रीचे वास्तव
चेक आऊट (दुपारी १२ वा.)

डॉरमेटरी : रु. ५५०/- प्रत्येकी
बांबु हाऊस : रु. ७००/- प्रत्येकी
कॉटेज : रु. ७५०/- प्रत्येकी
कॉटेज (A.C.): रु. १०००/- प्रत्येकी
१ नाश्ता व १ जेवणासहित

## दोन रात्रींचे पॅकेज

शाळा व कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी @ रु. १७५०/- प्रत्येकी


४ नाश्ता, २ दुपारचे जेवण, २ रात्रीचे जेवण
कॅम्पफायर, डीजे, रेन डान्स, स्विमिंग पूल, बैलगाडी सफारी, ट्रॅक्टर सफारी, सहित कृषी पर्यटनावर आधारित सहल प्रवास खर्च वगळता.

कौटुंबिक सहल, शालेय सहल, इंडस्ट्रीयल विझीट (I.V. Tours), ऑफिस कॉन्फरन्स, स्नेहसंमेलन, कौटुंबिक कार्यक्रम, साखरपुडा, लग्न व वाढदिवस समारंभ यासाठी योग्य ठिकाण.

## आपलं गाव मध्ये कसे याल ?

### स्थळ निर्देशक

टीप : गुगल मॅपवर प्रथम आर.टी.ओ. कराड सर्च करावे. नंतर तेथे पोहचल्यावर बेलदरे (आपलं गांव), कराड निर्देशित करावे.




अधिक माहिती व बुकींगसाठी :
श्री वनलक्ष्मी कृषी पर्यटन केंद्र (आपलं गांव)
मु. पो. बेलदरे, ता. कराड, जि. सातारा
मोबाईल : 8767914747/ 9869233657 / 9833622961 / 9764014235
aaplagaon@yahoo.com www.aaplagaon.com aaplagaon

आपलं गाव®
कृषी पर्यटनातून ग्राम विकास...

MAHARASHTRA TOURISM
Mahabhraman
Unique Tourism Experience

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ
मान्यता प्राप्त
श्री वनलक्ष्मी कृषी पर्यटन केंद्राचे

आपलं गाव®
कृषी पर्यटनातून ग्राम विकास...



# नाते आपल्या मातीशी


बांबु हाऊस


झोपाळा

**निसर्ग...**

**आपलं गाव वसलं आहे निसर्गाच्या सानिध्यात आणि डोंगरामध्ये, त्यामुळे हिरवळ गावात तसेच गावाच्या आजुबाजुला सुध्दा.**


पोत्याच्या उड्या


धबधबा


बास्केट बॉल


चविष्ट जेवण

**निवास व मनोरंजन :** प्रदुषणमुक्त व स्वच्छ वातावरणात स्वतःला ताजेतवाने करण्यासाठी व आरामदायी निवासासाठी येथे चार पर्यायात कॉटेज, बांबु हाऊस, कुटीर अथवा डॉरमेटरी. उपलब्ध आहे. मुक्कामी वास्तव्यात निसर्गानं नटलेल्या डोंगराच्या कुशीत प्रभात "शिवार" फेरीचां आनंद निश्चितच मिळेल. तसेच आपल्यातील खवय्या तृप्त व्हावा म्हणून आपलं गाव मधील शेतात पिकविलेले धान्य,भाज्या व फळे वापरुन स्वादिष्ट शाकाहारी आणि जैन खाद्यपदार्थ बनविले जातात.


बैठे खेळ


पंचकर्म

आपलं गाव मध्ये खेळ व मनोरंजनाची उत्तम व्यवस्था, यात आपण कॅरम, बुध्दिबळ, टेबल टेनिस, बास्केटबॉल, फुटबॉल, बॅटमिंटन, इनडोअर क्रिकेट, संगीत खुर्ची, रिंग फेक, झोपाळा असे विविध खेळ खेळू शकता. ग्रामीण जीवनाची नाळ तुटलेल्या नव्या पिढीसाठी लगोरी, विटी दांडू, पोत्याच्या उड्या, रस्सीखेच, ह्या खेळांची व बैलगाडी, घोडा सफारीचा अनुभव घेण्याची सुध्दा सोय येथे केली आहे. तसेच स्विमिंग पूल, रेन डान्समध्ये भिजण्याचा मनसोक्त आनंद लुटता येईल. त्याचप्रमाणे आपल्या मागणीनुसार सांस्कृतिक कार्यक्रम सुध्दा आयोजित केले जातील.

## ठळक वैशिष्ट्ये

आपलं गाव® कृषी पर्यटनातून ग्राम विकास...

- ★ महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या "**महाभ्रमण**" योजनेत मान्यता.
- ★ सातारा जिल्हा परिषद व महाराष्ट्र शासन कृषी विभाग यांच्या वतीने २०१६-१७ प्रथम "**यशवंतराव चव्हाण कृषी पर्यटन गौरव पुरस्काराने**" सन्मानित.
- ★ महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण पर्यटन (मार्ट) यांच्या वतीने सन २०१८-१९ च्या प्रथम पुरस्कारने सन्मानित.
- ★ कृषी पर्यटनातून स्थानिक ग्रामस्थांना रोजगाराची संधी. हसतमुख कर्मचारी वर्ग आपल्या सेवेस तत्पर.
- ★ स्थानिक महिला बचत गटांना प्रशिक्षण व रोजगार निर्मितीसाठी ऊत्तेजन.
- ★ ग्रामीण जीवन शैलीचा रसरशीत अनुभव आणि लोककलांना प्रोत्साहन.
- ★ देशी गाईचे गोपालन, गोसंवर्धन व पंचगव्य चिकित्सा बाबत मार्गदर्शन.
- ★ नैसर्गिक व सेंद्रिय शेती तसेच पर्यावरण पूरक प्रचार व प्रसार.


संगीत खुर्ची


बैलगाडी सफारी


गोंधळ


स्विमिंग पूल व रेन डान्स


नक्षत्र उद्यान/हास्य आनंद


मधमाशी पालन


कॅम्पफायर


घोडा सफारी


कॉन्फरन्स हॉल

**कृषी प्रकल्प :** आपलं गाव मध्ये आपल्याला सेंद्रिय शेती, मधमाशी पालन, ससे पालन, गांडूळ खत निर्मिती, बायोगॅस, बर्ड हाऊस, शेळी पालन, पशुपालन इत्यादी गोष्टींचा अनुभव घेता येईल. त्याचप्रमाणे आधुनिक शेतीसाठी लागणारी अवजारे प्रत्यक्ष हाताळता येतील.

आपलं गाव मधील नाविण्यपूर्ण आयुर्वेद पार्क मधून वेगवेगळ्या औषधी वनस्पतीची ओळख करुन घेता येईल. तसेच ऑक्सिजन पार्क व नक्षत्र उद्यान यातून ज्योतिषशास्त्र, वनस्पतीशास्त्र, आयुर्वेदशास्त्र व ॲक्यूप्रेशर ह्यांची माहिती घेता येईल.

**आयुर्वेदिक पंचकर्म व पंचगव्य चिकित्सा :** श्री वनलक्ष्मी गोशाळेच्या व्यवस्थापनातून देशी गाईचे मुक्त गोठा पध्दतीतून गो पालन, गो चिकित्सा व गो संवर्धन केले जाते. तसेच या देशी गोधनापासून मिळणारे दूध, ताक, तूप, गोमूत्र, गोमय या पंचगव्यापासून आरोग्यदायी उत्पादने बनविली जातात. तसेच आरोग्यास हितकारक व रोगप्रतिकारक गुणधर्म असलेल्या देशी गाईच्या गोमूत्रापासून शास्त्रोक्त पध्दतीने गोमूत्र अर्क बनविले जातात. सदर गोमूत्र अर्क विविध आजारावर उपयुक्त आहेत. म्हणूनच अनेक संस्थांनी देशी गाईचे गोमूत्र व गोमूत्र अर्क या बाबतीत विविध पेटेंट घेतली आहेत. तसेच पर्यटकांसाठी आरोग्यग्रामच्या माध्यामातून तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली आयुर्वेदिक पंचकर्म व पंचगव्य चिकित्सा आपलं गावच्या निसर्गरम्य वातावरणात उपलब्ध आहे.


सेल्फी पॉईंट


श्री वनलक्ष्मी गोशाळा

आपलं गाव मधील विठ्ठल - रखुमाई मंदिरामध्ये येऊन आपल्या मनाला प्रसन्नता लाभेल व कुटीर स्वरुपात असलेल्या ध्यानधारणा केंद्रात मनःशांतीचा अनुभूती मिळेल.


ससे व पक्षी पालन


गोमुत्र अर्क व पंचगव्य उत्पादन


दुग्धजन्य पदार्थ


गांडुळ खत

**शिक्षण वर्गापलीकडले...**

आपलं गाव तुम्हाला निसर्ग आणि शेतीच्या जवळ नेईल. वर्गाबाहेरील मिळालेल्या ह्या शिक्षणाने तुमचे जीवन अनुभव समृध्द होईल.


विठ्ठल रखुमाई मंदिर


शेळी/ कुक्कुट पालन